क्र. मपविम/आरक्षण/२०१२
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,
सी.डी.ओ.हटमेंटस्,
मादामा कामा रोड,
मुंबई ४०० ०२०.

दिनांक :

**विषय : रजा प्रवास सवलत**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ सन १९७५ पासून महाराष्ट्रामध्ये पर्यटन विकासासाठी प्रगतीपथावर कार्यरत आहे. महामंडळाच्या अनेक मालमत्ता महाराष्ट्रात पसरलेल्या आहेत. त्यापैकी २० मालमत्ता महामंडळ स्वत: चालवित आहे व इतर मालमत्ता खाजगी कंत्राटदारांस कंत्राट पध्दतीवर चालविण्यास दिलेल्या आहेत.

महामंडळामार्फत उपरोक्त पर्यटक निवासांसाठी दरपत्रक प्रसिध्द करण्यात येते. सदर दरपत्रकामध्ये महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी रजा प्रवास सवलतीसाठी खालीलप्रमाणे सूट जाहिर करण्यात येत आहे.

| | | पर्यटक हंगाम | बिगर पर्यटक हंगाम |
|---|---|---|---|
| १. | सोमवार ते गुरुवार | १०% सूट | २०% सूट |
| २. | शुक्रवार, शनिवार व रविवार | सूट नाही | सूट नाही |

उपरोक्त सूट ही पर्यटक/ बिगर पर्यटक हंगामासाठी लागू राहिल. (बिगर पर्यटक हंगाम हा जून ते सप्टेंबर असा असेल). सदर सवलत उपभोक्तांना संबंधित विभागाकडून शासकीय कर्मचारी यांनी रजा प्रवास सवलत मान्य असल्याचा दाखला/प्रमाणपत्र आवश्यक आहे.

व्यवस्थापकीय संचालक
म.प.वि.म., मुंबई